एन.जे.सी.क्र. ०१/२०१८
अमोल गडधने व ईतर..वि..कोणीही नाही

आदेश नि. क्र. १ खाली
(पारीत दि. २२.१२.२०१८)

१. सदरचे प्रकरण हे अर्जदाराने एम.जे.सी. नंबर २४/२०११ दि. ०८.०९.२०११ रोजी दाखल केलेल्या एम.जे.सी.मध्ये दि. १३.१२.२०११ रोजी वारसा प्रमाणपत्र देण्याचा आदेश न्यायालयाने पारीत केला होता. त्या आदेशाची पुर्तता करतांना दिलेलया ३०० रूपयांच्या स्टॅम्पवर अर्जदार क्र. १ याचे नाव अमोल भिमराव गडधने ऐवजी अमोल शिमराव गडधने असे टंकलेखनामध्ये चुकीने झाले होते. तरी अर्जदारांची अशी विनंती आहे की, टंकलेखनातील चुक दुरूस्त करून नविन वारसा प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारीत करावा. अर्जदाराने सदर प्रकरणामध्ये अर्जदार अमोल भिमराव गडधने याने दि. ०८.०९.२०११ रोजी दाखल केलेल्या एम.जे.सी. क्र. २४/२००१ अमोल भिमराव गडधने व इतर .वि..कोणीही नाही याची नक्कल आणि त्यावर मा. दिवाणी न्यायाधीश उमरखेड यांनी दि. १३.१२.२०११ रोजी पारील केलेल्या आदेशाची नक्कल सोबत जोडली आहे.

२. अर्जदाराची विनंती आहे की, भारतीय वारसा कायदा ३८२ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र टंकलेखनात झालेली चुक दुरूस्त करून मिळण्यात यावी तसेच अर्जदार हे मयत भिमराव तुकाराम गडधने यांचे वारस असल्याने त्यांना वारसा प्रमाणपत्र देण्याचा आदेश व्हावा.

३. सदर प्रकरणामध्ये अर्जदाराने दाखल केलेल्या एम.जे.सी क्र. २४/२०११ मधील नि. क्र. १ व त्यावरील आदेशाचे अवलोकन केले तसेच अर्जइदार यांनी या न्यायालयाने दिलेले मुळ वारसाप्रमाणपत्राचे अवलोकन केले. एम.जे.सी.क्र. २४/२०११ मधील आदेशान्वये दि. १३.१२.२०११ रोजी दिलेल्या वारसाप्रमाणपत्रामध्ये अमोल भिमराव गडधने ऐवजी अमोल शिमराव गडधने ही टंकलेखनामध्ये चुक झालेली दिसुन येते. सदरची चुक ही तांत्रीक स्वरूपाची असल्यामुळे वारसा प्रमाणपत्रामध्ये दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्जदार यांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार यांना अमोल भिमराव गडधने अशी वारसाप्रमाणपत्रामध्ये दुरूस्ती करून नविन वारसाप्रमाण पत्र देण्यात यावे.

३. दि. १३.१२.२०११ रोजी देण्यात आलेले मुळ वारसाप्रमाणपत्र सदर प्रकरणाच्या अभिलेख्यात संदर्भासाठी ठेवण्यात यावे.

स्वा/—
(श्रीमती एस.एस.जाधव)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
उमरखेड
दि. २२.१२.२०१८